FORM-1A

0058159

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: लाप्रवि मुंबई, पहिली खबर क्र. FIR No.: १९/२४, वर्ष Year: २०२४, दिनांक Date: २८/०३/२४

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८, कलमे Sections: ७, १२
   (ii) अधिनियम Act: —, कलमे Sections: —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day: मंगळवार, तारीख पासून Date from: २६/०३/२४, वेळ Time: १६.४४, तारीख पर्यंत Date to: २७/०३/२४, वेळ Time: १५.५५
   वेळेचा अवधी (पहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: २८/०३/२०२४ वेळ Time: ...
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ०६/२०२४, तारीख Date: २८/०३/२४, वेळ Time: ०७.३०

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral: —

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.: सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे समोरील पासपोर्ट, चौकी / बीट / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: कक्ष, सर जे.जे. मार्ग पो. ठाणे, मुंबई. ठिकाणाचे नंबर No. if any ..., गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road ...
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: खान मोहम्मद आरिफ
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: हाजी मोहम्मद सईद
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ४४ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ९६१९९६२५१५९
   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: —, दिल्याचा दिनांक Date of Issue: —, दिल्याचे ठिकाण Place of Issue: —, (f) व्यवसाय Occupation: स्क्रिन प्रिंटिंग
   (g) धर्म Religion: मुस्लिम, जात Caste: —, जनजात Sub-Caste: —
   (h) पत्ता Address: एन एफ हाईट, ११ वा माळा, रु.नं. ११०६, नागपाडा, मुंबई-०८ (Ward, House/Name No., Phone/M. No., PAN No., Card No.)
   रस्त्याचे नाव Road ..., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P. Stn. ...
   तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ..., सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म **1-B** वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   १) निलेश गजानन शिंदे/३२ वर्षे, धंदा - नोकरी (पोशि. १८०८९३/सर जे.जे. मार्ग पोठाणे), राह - रु.नं. १०७/२, B विंग, M.T. कंपाऊंड, नागपाडा, मुंबई-०८
   २) साहेबराव दत्तात्रय जाधव/५२ वर्षे, धंदा-नोकरी (पोह. ०३९०८/सर जे.जे. मार्ग पो.ठाणे), राह - वरळी पोलीस कॅम्प, बि.नं. २९, रु.नं. १६, वरळी, मुंबई-३०.

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

यातील फिर्यादी खान मोहम्मद आरिफ मोहम्मद सईद, वय ४४ वर्षे,
राहणार- एन एफ हाईट, ११ वा माळा, रु नं ११०६, नागपाडा, मुंबई-०८
यांचा स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आलेला जबाब हीच सदर गुन्ह्याची
प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Namade

(संदिप वन्हाडे)
पोलीस निरीक्षक,
व्याप्रवि. मुंबई.

फिर्याद दिनांक-२८/०३/२०२४

माझे नाव खान मोहम्मद आरिफ हाजी मोहम्मद सईद, वय-४४ वर्षे, व्यवसाय-स्क्रिन प्रिंटींग, राहणार-एनएफ हाईट, ११ वी मंजिल, रुम नं-११०६, नागपाडा, मुंबई-४००००८, मोनं-९६९९६२५९५९

आज रोजी समक्ष अँटी करप्शन ब्युरो, मुंबई कार्यालयामध्ये येवुन फिर्याद देतो की, मी दिनांक-२६/०३/२०२४ रोजी अँटी करप्शन ब्युरो, मुंबई कार्यालयामध्ये येवुन श्री.निलेश शिंदे, पोलीस, नेमणुक-जेजे मार्ग पोलिस स्टेशन हे माझी पत्नी खान शगुफ्ता मोहम्मद आरिफ, व माझा मुलगा खान मोहम्मद अमान मोहम्मद आरिफ यांचे पासपोर्ट वेरिफिकेशन संबंधाने माझेकडे ६०००/- रुपयांची लाच मागणी करत असलेबाबत तक्रार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेसाठी दिनांक-२६/०३/२०२४ रोजी पोलीस निलेश शिंदे यांची भेट घेणेकामी शासकीय पंच क्र.१ श्री. विरेंद्र सामलेटी व व्हाईस रेकॉर्डरसह मला सापळा अधिकारी श्री. संदिप वऱ्हाडे यांनी व त्यांचेसोबतचे सपोआ श्रीमती अडसुरे मॅडम यांनी जेजे मार्ग पोलिस स्टेशन येथे दुपारी १६:४५ वाजता पाठविले असता सदर ठिकाणी निलेश शिंदे पोलिस यांची भेट झाली. त्यावेळी प्रथम मी त्यांचेकडे माझे कामासंबंधाने चर्चा केली. त्यावेळी पोलीस निलेश शिंदे यांनी माझेकडे ६००० रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ५०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी पुन्हा पोलिस निरीक्षक वऱ्हाडे व त्यांचे पथक थांबलेल्या ठिकाणी परत येवुन घडलेली हकिगत सांगितली. त्यावेळी श्री.वऱ्हाडे यांनी व सपोआ श्रीमती अडसुरे मॅडम यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डरमधील रेकॉर्डीग ऐकली. त्यावरुन पोलिस निलेश शिंदे यांनी माझे पत्नी व मुलाचे पासपोर्टचे वेरिफिकेशनसाठी ५०००/- रुपये लाच मागणी केल्याची पोलिस निरीक्षक वऱ्हाडे व त्यांचेसोबतचे वरिष्ठ अधिकारी सपोआ श्रीमती अडसुरे मॅडम यांची खात्री झाली. म्हणुन पोलिस निरीक्षक वऱ्हाडे यांनी मला लाच मागणी झालेली रक्कम ५,०००/- रुपये हजर करणेस सांगितली त्याप्रमाणे मी ५००/- रुपये दराच्या १० नोटा पोलिस निरीक्षक वऱ्हाडे यांचेकडे हजर केल्या. त्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन माझेकडे परत दिल्या. व माझेसोबत व्हाईस रेकॉर्डर देवुन शासकीय पंच श्री.विरेंद्र सामलेटी यांचेसोबत सदरची लाच रक्कम श्री.निलेश शिंदे, पोलिस यांना देण्यासाठी जेजे मार्ग पोलिस स्टेशन येथे रवाना केले. व माझे पाठोपाठ पोलिस निरीक्षक वऱ्हाडे व त्यांचे सर्व पथक जेजे मार्ग पोलिस स्टेशन, मुंबई चे परिसरामध्ये आजुबाजुला येवुन थांबले.

मी श्री.निलेश शिंदे, पोलीस यांची भेट घेतली असता श्री.निलेश शिंदे यांनी मला सांगितले होते की, "तुम्ही आता जा मी तुम्हाला फोन करतो." त्यानंतर मी पुन्हा पंच श्री.विरेंद्र सामलेटी यांचेसह आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे मी घडलेली हकिगत पोलिस निरीक्षक वऱ्हाडे व उपस्थित अधिकारी श्रीमती अडसुरे मॅडम यांना सांगितली. त्यानंतर त्या दिवसाची कार्यवाही स्थगीत करुन पुढील कार्यवाही निलेश शिंदे यांचा फोन आलेनंतर करण्याचे ठरविले होते.

त्यानंतर दिनांक-२७/०३/२०२४ रोजी मी माझे घरी हजर असताना मला पोलीस निलेश शिंदे यांचा त्यांचा मोबाईल नंबर-९१५८४७५७३७ वरुन माझे मोबाईल नंबर-९६९९६२५९५९ वर फोन आला होता. परंतु तो मी उचलला नाही. त्यानंतर पुन्हा मी निलेश शिंदे पोलिस यांना फोन केला असता त्यांनी मला लगेच जेजे मार्ग पोलिस स्टेशन येथे बोलाविले होते परंतु मी त्यांना लगेच येवु शकत नसल्याचे सांगतिले व त्यानंतर लगेच अँटी करप्शन ब्युरो मुंबई च्या ऑफिसमध्ये गेलो. तेथे सदरची हकिगत पोलिस निरीक्षक वऱ्हाडे व त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांना सांगताच ते दोन शासकीय पंचांसह व त्यांचे पथकासह माझे सोबत भायखळा परिसरामध्ये आले. तेथे आम्ही पोहचल्यावर पुन्हा पोलिस निलेश शिंदे यांचा माझे मोबाईलवर फोन आला होता. त्यानंतर लागलीच श्री.निलेश शिंदे, पोलिस यांनी मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कम ५०००/- रुपये( त्यामध्ये ५०० रुपये दराच्या १० नोटा) अशी रक्कम ॲथ्रासिन पावडर लावुन माझे शर्टच्या खिशामध्ये ठवण्यात आली. व त्यानंतर माझेसोबत व्हाईस रेकॉर्डर देवुन शासकीय पंच श्री. सागर पवार यांचेसोबत मला सदरची लाच रक्कम पोलिस श्री.निलेश शिंदे यांना देण्यासाठी जेजे मार्ग पोलिस स्टेशन येथे रवाना केले. माझे मागोमाग पोलिस निरीक्षक वऱ्हाडे व त्यांचे सापळा पथक येवुन जेजे मार्ग पोलिस स्टेशनचे परिसरामध्ये कुणाच्याही नजरेस येणार नाही अशा पद्धतीने थांबुन राहिले. त्यावेळी मी निलेश शिंदे यांचे कार्यालयामध्ये गेलो असता माझे पत्नी व मुलाचे पासपोर्टचे कामासंबंधाने तेथील हजर असलेले पोलिस श्री.जाधव यांचेशी माझी चर्चा झाली. त्यानंतर मी त्यांचे कार्यालयाचे बाहेर येताच थोड्याच वेळामध्ये तेथे पोलिस निलेश शिंदे आले. निलेश शिंदे यांचेशी मी माझे कामासंबंधाने चर्चा केली. त्यानंतर श्री.निलेश शिंदे यांनी मला लाचेची रक्कम त्यांचे टेबलच्या ड्रावरमध्ये ठेवण्यास सांगितली. त्यावेळी मी पोलिस निलेश शिंदे यांचे सांगणेप्रमाणे माझेकडील अँथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम ५०००/- रुपये ( त्यामध्ये ५०० रुपये दराच्या १० नोटा) अशी रक्कम श्री.निलेश शिंदे यांचे कार्यालयामध्ये जावुन त्यांचे टेबलच्या ड्रावरमध्ये

ठेवली. त्यावेळी मला कार्यालयामध्ये हजर असलेले श्री.जाधव यांनी विचारपुस केली असता मी त्यांना सांगितले की, मला शिंदे साहेबांनी ५०००/- रुपये ड्रावरमध्ये ठेवायला सांगितली आहे." त्यावर श्री.जाधव हे काहीएक बोलले नाही. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन पुर्वनियोजित इशारा केला असता सापळा पथकाने लागलीच पोलिस श्री.निलेश शिंदे यांना ताब्यात घेतले ती वेळ सायंकाळचे ०३.५५ वाजताची होती. पोलिस श्री.निलेश शिंदे यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव निलेश गजानन शिंदे, वय-३२वर्षे, पोशि/क्रमांक-१४०७९३, नेमणुक-सर जेजे मार्ग पोलिस स्टेशन, मुंबई, राहणार-रुम नं-१७१/२, बी, विंग, मोटार परिवहन विभाग कंपाउंड, नागपाडा, मुंबई असे सांगितले. त्यानंतर पोलिस निरीक्षक वऱ्हाडे व त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्रीमती अडसुरे मॅडम यांनी लाच रकमेबाबत मला विचारता मी त्यांना श्री.निलेश शिंदे यांनी लाच रक्कम त्यांचे टेबलच्या ड्रावरमध्ये ठेवण्यास सांगितली असल्याने मी लाचेची रक्कम निलेश शिंदे यांचे टेबलचे ड्रावरमध्ये ठेवली असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिस श्री. निलेश शिंदे यांना घेवुन सापळा पथक त्यांचे पासपोर्ट वेरिफिकेशचे कार्यालयामध्ये गेले असता तेथे श्री. जाधव पोलिस हजर होते. त्यांना त्यांचे पुर्ण नाव-पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री.साहेबराव दत्ताराम जाधव, वय-४८वर्षे, पोलिस हवालदार क्र.०३१०८, नेमणुक-सर जेजे मार्ग पोलिस ठाणे, मुंबई, राहणार-रुम नं-१६, बिल्डिंग नं-२९, वरळी पोलिस कॅम्प, मुंबई असे सांगितले. त्यावेळी पोलिस निरीक्षक वऱ्हाडे व त्यांचेसोबतचे अधिकारी श्रीमती अडसुरे मॅडम यांनी त्यांचे सोबतचे दोन्ही पंचांसमक्ष श्री.निलेश शिंदे यांचे ड्रावर चेक केले असता त्यामध्ये मी ठेवलेली लाच रक्कम तेथे मिळुन आली नाही. म्हणुन सदरचे रुममधील लाईट बंद करुन अल्ट्राव्हायलेट लाईटच्या प्रकाशामध्ये तपासणी केली असता निलेश शिंदे हे बसतात त्या टेबलच्या ड्रावरमध्ये अँथ्रासिन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर कार्यालयामध्ये उपस्थित श्री.साहेबराव जाधव यांच्या दोन्ही हातांची दोन्ही पंचांसमक्ष अल्ट्राव्हायलेट लाईटच्या प्रकाशामध्ये तपासणी केली असता त्यांच्या दोन्ही हातांना अँथ्रासिन पावडरची चकाकी दिसुन आली. तेव्हा त्यांना लाच रकमेबाबत विचारणा करता त्यांनी काहीएक सांगितले नाही. म्हणुन आम्ही पासपोर्ट कक्षामधील ट्युबलाईट चालु करुन त्याचे प्रकाशमध्ये निलेश शिंदे बसतात त्या पासपोर्ट कक्षाची तपासणी केली असता तेथील टेबलच्या ड्रावरखाली असलेल्या कप्प्यामध्ये एका प्लॅस्टीक पिशवीमध्ये लाच रक्कम मिळुन आली. त्यानंतर सदरच्या रुममधील ट्युबलाईट बंद करुन अल्टाव्हायलेट लाईटच्या प्रकाशामध्ये सदरच्या रकमेची तपासणी करता त्यावर अँथ्रासिन पावडरची चकाकी दिसुन आली. तसेच सदरच्या नोटांचे नंबरची पडताळणी केली असता त्याच नोटा असल्याची खात्री झाली. त्यावरुन जेजे मार्ग पोलिस स्टेशनचे पासपोर्ट कक्ष येथे उपस्थित श्री.साहेबराव जाधव यांनी सापळा कारवाईची चाहुल लागताच मी ठेवलेली लाच रक्कम त्यांचे टेबलचे ड्रावरमधुन काढुन ती टेबलच्या खालील कप्प्यामध्ये ठेवल्याचे निष्पन्न झाले, म्हणुन पोलिस निरीक्षक वऱ्हाडे व त्यांचे सोबतचे पथकाने श्री.साहेबराव जाधव यांना देखील ताब्यात घेतले.

तरी, माझी पत्नी शगुफ्ता मोहम्मद आरिफ, उमर-४३ साल और मेरा बेटा खान मोहम्मद अमान मोहम्मद आरिफ, उमर-१ साल यांचे पासपोर्टचे वेरिफिकेशन करुन देण्यासाठी निलेश गजानन शिंदे, वय-३२वर्षे, पोशि/क्रमांक-१४०७९३, नेमणुक-सर जेजे मार्ग पोलिस स्टेशन, मुंबई, राहणार-रुम नं-१७१/२, बी, विंग, मोटार परिवहन विभाग कंपाउंड, नागपाडा, मुंबई यांनी माझेकडे ५०००/- रुपयांची लाचमागणी करुन सदरची लाच रक्कम त्यांचे पासपोर्ट कक्षातील टेबलचे ड्रावरमध्ये ठेवण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी लाच रक्कम ड्रावरमध्ये ठेवल्यानंतर श्री.साहेबराव दत्ताराम जाधव, वय-४८वर्षे, पोलिस हवालदार क्र.०३१०८, नेमणुक-सर जेजे मार्ग पोलिस ठाणे, मुंबई, राहणार-रुम नं-१६, बिल्डिंग नं-२९, वरळी पोलिस कॅम्प, मुंबई यांनी सदरची लाच रक्कम ड्रावरमधुन ताब्यात घेवुन ती एका काळ्या रंगाच्या प्लास्टीकच्या पिशवीमध्ये ठेवुन सदरची पिशवी त्यांचे टेबलच्या ड्रावरच्या खालील कप्प्यामध्ये लपवुन ठेवुन लोकसेवक क्रमांक-१ निलेश शिंदे यांना लाच रक्कम स्विकारण्यास सहाय्य केले म्हणुन माझी १) निलेश गजानन शिंदे व २) श्री साहेबराव दत्ताराम जाधव या दोघांचेविरुद्ध फिर्याद आहे.

माझी फिर्याद मराठीमध्ये टाईप करुन मला वाचुन दाखवुन मला हिंदी भाषेमध्ये समजावुन सांगितली आहे. ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(संदिप सुकदेव वऱ्हाडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

तक्रारदाराची सही

8. तक्रारदार / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........... तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमूद ता. वे. व ठिकाणी यातील फिं"ची पत्नी व मुलाचे पारपत्र व्हेरिफिकेशन करून देण्यासाठी आलोसे क्र. १- निलेश शिंदे, नेमणूक सर जे.जे. मार्ग पो.ठाणे यांनी फिं"कडे ५०००/- रु. ची लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम त्यांचे पासपोर्ट कक्षातील टेबलचे ड्रॉवरमध्ये ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे फिं"नी लाच रक्कम ड्रॉवरमध्ये ठेवल्यानंतर आलोसे क्र. २- साहेबराव जाधव, पोशि ०३२०८/सर जे.जे. मार्ग पो.ठाणे यांनी सदर लाच रक्कम ड्रॉवरमधून ताब्यात घेऊन ती एका काळ्या रंगाच्या प्लास्टिकच्या पिशवीमध्ये ठेवून सदर पिशवी टेबल ड्रॉवरच्या खालील कप्प्यामध्ये लपवून ठेवून आलोसे क्र. ०१ यांनी सदर लाच रक्कम स्विकारण्यास सहाय्य केले म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पो.नि. संदिप वऱ्हाडे, लाप्रवि मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........., जिल्हा ........., राज्य .........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................. (3) Transferred to P. S. .................. District.................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name श्री. संदिप वऱ्हाडे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई.

Posting

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**